No. of Printed Pages : **4**

**एफ.एम.टी.-01**

01494

# BDP / BCA / BTS

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

## जून, 2013

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*समय : 2 घण्टे* *अधिकतम अंक : 50*

---

**1.** खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : **10**

(a) राष्ट्रीय एकात्मतेची आवश्यकता

(b) माझा आवडता लेखक

(c) शेतकरी आणि समाज

(d) स्त्रीभ्रूण हत्या - एक सामाजिक कलंक

**2.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : **8**

(a) संत तुकाराम आपल्या अभंगातून आपल्या जीवनाचे, पर्यायाने संतांच्या जीवनाचे कार्य, त्याचा हेतू कोणता असल्याचे सांगतात ?

(b) केशवसुतांच्या मते कवि प्रतिभेचे कार्य कोणते ?

(c) मर्ढेकरांच्या काव्यशैलीची वैशिष्ट्ये कोणती ते स्पष्ट करा.

(d) जुनी कथा आणि नवी कथा यांमधील फरक स्पष्ट करा.

3. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 6

(a) 'वळीव' कथेत वादळाचे वर्णन कसे केले आहे ?

(b) चेलम्याचे पाणी पिताना प्रल्हादची मन:स्थिती कशी होती ?

(c) एकांकिकेतील 'एककेंद्रितता' हे वैशिष्ट्य 'सांबर' या एकांकिकेच्या आधारे स्पष्ट करा.

(d) 'गुंड्याभाऊचे दुखणे' या विनोदी कथेच्या आधारे विनोदाच्या तीन प्रमुख प्रकारांची माहिती द्या.

4. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** विषयांवर टीपा लिहा : 6

(a) 'ऐतिहासिक सत्य' आणि 'साहित्यातील सत्य'.

(b) बालगंधर्वांचे रूपदर्शन.

(c) लोकशाही व हुकूमशाही.

(d) नागरिकाला लाभणारे अधिकार.

5. (a) शब्दयोगी अव्यय म्हणजे काय ते सोदाहरण सांगा. 2

(b) पुढील शब्दांचे अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा. 3

(i) ऊर्मी (ii) निर्लेप

(iii) अगतिक

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : 3

(a) पिंगा घालणे.

(b) ताव मारणे.

(c) तोंडचे पाणी पळणे.

(d) जिवाची मुंबई करणे.

(e) काळीज उलटे असणे.

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) घरोघर मातीच्याच चुली

(b) आंधळं दळतं, कुत्रं पीठ खातं

(c) ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी

(d) अगं अगं म्हशी, मला कुठे नेशी

(e) हलवायाच्या घरावर तुळशीपत्र

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर लिहा : 4

(a) न्यायाच्या क्षेत्रात टक्केवारीचे गणित स्वीकारणे हे अन्यायमूलक कसे ?

(b) श्रमाला प्रतिष्ठा दिल्याशिवाय शिक्षण अर्थपूर्ण होणार नाही, असे कर्मवीर भाऊराव पाटील यांना का वाटते ?

(c) 'स्त्री–मुक्ती म्हणजे केवळ तिचे आर्थिक स्वातंत्र्य नाही, तर तिची मानसिक व सांस्कृतिक गुलामगिरीतूनही मुक्तता झाली पाहिजे' असे छाया दातार का म्हणतात ?

(d) गणकयंत्र हे मानवाला वरदान का वाटते ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

Socrates, the great Greek philosopher always tried to check his temper. He believed that an angry man was almost a beast. But unfortunately his wife disliked her husband's peaceful nature. She never lost an opportunity to tease him. One day something happened and she became very angry. She started criticising Socrates. She cursed Socrates but he did not say a word. Greatly enraged , she emptied a pitcher of water over his head. Socrates did not protest. He smiled and said, "After such thunder, one does expect a shower."

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : 4

कला ही मानवी जीवनाचे नुसते प्रतिबिंबच दाखवीत नाही, तर त्याला वळण देते; ती मानवी मनाची नुसती करमणूकच करीत नाही, तर त्याला उद्बोधित करते; व ती मानवी जीवन नुसते मंडितच करीत नाही, तर अभिनव ध्येयांच्या प्रभावाने ते आमूलाग्र बदलून टाकते. जीवनाचे हुबेहूब प्रतिबिंब दाखविण्यात किंवा यथार्थ चित्रण करण्यात कलेचा उद्देश केवळ पुन:प्रत्ययाचा आनंद मनुष्याला मिळवून देण्याचा नसतो. त्या आनंदाबरोबरच जीवनातील सारे दोष आणि उणीवा मनुष्याच्या नजरेस आणून देऊन ते अधिक निर्दोष आणि पूर्ण बनविण्याची आकांक्षा त्याच्या ठिकाणी निर्माण करणे हा कलेचा हेतू आहे.